**ठळक बातम्या**

- नवी दिल्लीत एआय समिटच्या निमित्ताने प्रधानमंत्र्यांची देशोदेशीच्या राष्ट्रप्रमुखांशी चर्चा
- कृत्रिम बुद्धिमत्ते संदर्भात संयुक्त राष्ट्र जागतिक स्तरावर संवाद प्रक्रिया सुरू करणार
- राज्यसभेच्या ३७ जागांसाठी द्वैवार्षिक निवडणूक जाहीर/ महाराष्ट्रातल्या ७ जागांचा समावेश
- महाराष्ट्रात मुस्लिमांसाठीचं ५ टक्के आरक्षण रद्द

**आणि**

- टी ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेत आज ग्रुप ए मधे भारताचा सामना नेदरलँडसबरोबर अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडीयमवर

**<><><><><>**

नवी दिल्लीत एआय समिटच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज देशोदेशीच्या राष्ट्रप्रमुखांशी चर्चा करत आहेत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि स्पेनचे राष्ट्राध्यक्ष पेद्रो सांचेझ यांची आज नवी दिल्लीत हैदराबाद हाऊसमधे भेट झाली. भारत आणि स्पेनमधले संबंध अधिक दृढ करण्याच्या दृष्टीने ही भेट महत्त्वाची होती. व्यापार आणि अर्थव्यवस्था, नवोन्मेष, आरोग्य, पर्यावरण संरक्षणाविषयीचा कृती कार्यक्रम, शिक्षण आदी मुद्द्यांवर या भेटीत चर्चा झाल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने सांगितलं. भारत-युरोपियन युनियन संबंधांचं सातत्याने समर्थन केल्याबद्दल प्रधानमंत्री मोदी यांनी स्पेनची प्रशंसा केली.

प्रधानमंत्री मोदी यांनी फिनलँडचे प्रधानमंत्री एँती पेट्टारी ओर्पो यांच्याशीही चर्चा केली. एआय संशोधन आणि नवोन्मेष तसंच द्विपक्षीय संबंध बळकट करण्यासाठी भारतीय टॅलेंटचा कसा उपयोग होईल यावर दोन्ही नेत्यांनी चर्चा केली. एआय क्षेत्रात नवोन्मेषक म्हणून उदयाला येत असल्याबद्दल प्रधानमंत्र्यांनी फिनलँडचं कौतुक केलं.

मोदी सध्या सर्बियाचे राष्ट्राध्यक्ष अलेक्झांडर वुसिक यांच्याशी चर्चा करत आहेत.

क्रोएशियाचे प्रधानमंत्री अंद्रेज प्लेनकोविक, एस्टोनियाचे राष्ट्राध्यक्ष अलर करीस, भुतानचे प्रधानमंत्री देशो त्शेरिंग तोबगे आणि कझाकिस्तानचे प्रधानमंत्री ओलझास बेकटेनोव

यांच्याशीही प्रधानमंत्री मोदी चर्चा करणार आहेत. त्याआधी आज सकाळी प्रधानमंत्र्यांनी गुगलचे सीईओ सुंदर पिचाई यांची भेट घेतली.

**<><><><><>**

कृत्रिम बुद्धिमत्ते संदर्भात जागतिक स्तरावर संवाद प्रक्रिया सुरू करण्याचं संयुक्त राष्ट्राचं नियोजन असल्याचं संयुक्त राष्ट्राचे महासचिव एँतिनियो गुटेरस यांनी म्हटलं आहे. यात विविध देशांची सरकारं, खासगी क्षेत्र आणि नागरी संस्थांना सहभागी करून घेतलं जाईल. एआय संदर्भात जागतिक स्तरावर सहकार्य दृढ करण्यासाठी तीन उपक्रम आखले जाणार आहेत. यात ४० तज्ञांचा सहभाग असलेल्या आंतरराष्ट्रीय वैज्ञानिक पॅनेलचा समावेश असेल असं गुटेरस यांनी सांगितलं. या पॅनेलमधे आयआयटी मद्रासचे प्राध्यापक बलरामन रवींद्रन यांचाही समावेश आहे.

गुटेरस प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेणार असून एआय समिटला संबोधित करणार आहेत.

**<><><><><>**

आजच्या काळात जगाला भेडसावणाऱ्या विविध समस्यांचं निराकरण कृत्रिम बुद्धीमत्तेच्या माध्यमातून करण्यावर भारत लक्ष केंद्रीत करत असल्याचं केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञानमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज सांगितलं. नवी दिल्लीत सुरू असलेल्या इंडिया एआय समिटमध्ये आयोजित संशोधन परिसंवादाच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते.

देशातल्या उद्योगांमधील उत्पादकता वाढावी तसंच आरोग्य, कृषी आणि हवामान बदल या क्षेत्रात उद्भवणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी एआय तंत्रज्ञानाला प्राधान्य दिलं जात असल्याचं वैष्णव यांनी सांगितलं. एआय संमेलनामधून विविध तंत्रज्ञान विषयाक मुद्यांवर विचारविनिमय करण्याची महत्त्वाची संधी मिळाल्याचं वैष्णव यांनी सांगितलं. एआय हे एक शक्तीशाली तंत्रज्ञान असून त्याचा वापर मानवाच्या हितासाठी केला जावा असं मत त्यांनी केलं. या संमेलनात सहभागी झालेल्या तज्ज्ञांनी या तंत्रज्ञानाच्या सुरक्षित वापराबाबतच्या स्पष्ट आणि ठोस सूचना द्याव्यात असं आवाहनही वैष्णव यांनी केलं.

**<><><><><>**

देशाच्या सागरी नौवहनाच्या सुरक्षिततेसाठी भारतीय नौदल सतत सतर्क असल्याचं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. आंध्रप्रदेशात विशाखापट्टणमजवळ इथं आंतरराष्ट्रीय नौदल संचलनाला आज त्या संबोधित करत होत्या. बंगालच्या उपसागरात आयोजित या आंतरराष्ट्रीय संचलनात भारतीय नौदलाचं सामर्थ्य आणि नौवहनाच्या क्षमतेचं दर्शन घडवण्यात येणार आहे.

<><><><>

यंदाच्या अर्थसंकल्पात महिला आणि मुलींच्या कल्याणासाठी ५ लाख १ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ही तरतूद गेल्या आर्थिक वर्षातल्या ४ लाख ४९ हजार कोटी रुपयांच्या तुलनेने ११ पूर्णांक ५५ शतांश टक्के जास्त आहे. अर्थसंकल्पातल्या एकूण तरतुदींपैकी महिलांसाठीच्या तरतुदींचा वाटा गेल्या आर्थिक वर्षात ८ पूर्णांक ८६ शतांश टक्के इतका होता. तो आता चालू आर्थिक वर्षात ९ पूर्णाक ३७ शतांश टक्क्यांपर्यंत वाढला आहे, अशी माहिती केंद्रीय महिला आणि बालविकास मंत्रालयानं दिली.

<><><><>

राज्यसभेच्या रिक्त होणाऱ्या ३७ जागांसाठी द्वैवार्षिक निवडणुकांची घोषणा केंद्रीय निवडणूक आयोगानं आज केली. यात महाराष्ट्रातल्या सात जागांचा समावेश आहे.

डॉ.भागवत कराड, डॉ.फौजिया खान, प्रियंका चतुर्वेदी, शरद पवार, धैर्यशील पाटील, रजनी पाटील आणि रामदास आठवले या सात सदस्यांचा कार्यकाळ २ एप्रिल रोजी संपणार आहे. या रिक्त जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीची अधिसूचना २६ फेब्रुवारी रोजी जारी केली जाईल. उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख ५ मार्च तर ६ मार्च ला उमेदवारी अर्जांची छाननी केली जाईल. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत ९ मार्चपर्यंत आहे. १६ मार्चला सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत मतदान होईल आणि त्याच दिवशी संध्याकाळी ५ वाजता मतमोजणी करून निकाल जाहीर केला जाणार आहे.

महाराष्ट्राबरोबरच ओदिशा, तामिळनाडू, पश्चिम बंगाल, आसाम, बिहार, छत्तीसगड, हरियाणा, हिमाचल प्रदेश आणि तेलंगणा या राज्यांतही राज्यसभेच्या रिक्त होणाऱ्या जागांसाठी निवडणूक होणार आहे.

<><><><>

महाराष्ट्रात शिक्षण आणि नोकऱ्यांमधे मुस्लिम समाजासाठीचं पाच टक्के आरक्षण सरकारनं रद्द केलं आहे. याबाबतचा शासन निर्णय काल जारी झाला. राज्यातल्या काँग्रेस - राष्ट्रवादी काँग्रेसआघाडी सरकारनं मराठा समाजासाठी १६ टक्के आणि मुस्लिम समाजासाठी ५ टक्के आरक्षणची तरतूद करणारा अध्यादेश काढला होता. त्याचा कालावधी समाप्त झाला असून आरक्षणाचा प्रश्न न्यायप्रविष्ट असल्यानं हे आरक्षण रद्द केलं आहे.

<><><><>

भारतीय प्रशासकीय सेवेतील ज्येष्ठ अधिकारी विवेक भीमनवार यांनी आज महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदाची शपथ घेतली. लोकभवन इथं झालेल्या कार्यक्रमात राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी भीमनवार यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. शपथविधीनंतर राज्यपाल, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भीमनवार यांचं अभिनंदन केले. भीमनवार यांची नियुक्ती सहा वर्षांसाठी करण्यात आली आहे.

<><><><>

टी ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेत आज ग्रुप ए मधे भारताचा सामना नेदरलँडसबरोबर अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडीयमवर संध्याकाळी ७ वाजता होणार आहे.

श्रीलंकेत कोलंबो इथं पाकिस्तान विरुद्ध नामिबिया हा ग्रुप ए चा दुसरा सामना दुपारी ३ वाजता सुरु होईल.

युएई विरुद्ध दक्षिण आफ्रिका, हा ग्रुप डी चा सामना दिल्लीच्या अरुण जेटली मैदानावर सुरु आहे. दक्षिण आफ्रिकेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. २० षटकात ६ बाद १२२ धावा करुन संयुक्त अरब अमिरात संघानं विजयासाठी १२३ धावांचं लक्ष्य दक्षिण आफ्रिकेसमोर ठेवलं आहे.

<><><><>

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत पूर्व विजेत्या बंगालला हरवून जम्मू काश्मीरचा संघ प्रथमच उपांत्यफेरीत पोहोचला आहे. पश्चिम बंगालमधे कल्याणी इथं आज संपलेल्या या सामन्यात बंगालच्या संघाने विजयासाठी १२६ धावांचं आव्हान जम्मूकाश्मीरला दिलं होतं. ते ३४ षटकं आणि ४ चेंडूत ४ गडी गमावून जम्मूकाश्मीरने पूर्ण केलं.

<><><><>

भगवान बुद्धांचे श्रीलंकेतून आणलेले पवित्र अवशेष आज तमिळनाडूत कांचीपुरम इथं पोहोचले. तिथल्या बुद्ध विहारात त्यांची प्रतिस्थापना आणि प्रार्थना करण्यात आली. कांची पुरम हे बौद्ध धम्माचं इसवी सन पूर्व दुसऱ्या शतकात पल्लव साम्राज्याच्या काळातलं महत्त्वाचं केंद्र होतं.

<><><><><>

कोकण किनारपट्टी आणि पठारावर आढळणाऱ्या हजारांपेक्षा जास्त प्राचीन कातळशिल्पांचं सखोल संशोधन, दस्तऐवजीकरण आणि त्यांच्या संरक्षणासाठी वर्ल्ड हेरिटेज डेस्कची स्थापन करण्यात आल्याची माहिती राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशीष शेलार यांनी दिली आहे. यासाठी राज्य शासनाने १४ कोटी ६२ लाखांहून अधिक खर्चाला मान्यता दिली आहे. याअंतर्गत क्षेत्रीय सर्वेक्षण, जीपीएस आधारित त्यांचे नकाशे निश्चित केले जातील, तसंच त्यांच्याशी संबंधित स्थानिक लोककथांचं संकलन करण्यात येईल. प्रकल्पाच्या अंमलबजावणीची जबाबदारी पुरातत्व आणि वस्तुसंग्रहालये संचालनालय, मुंबई यांच्याकडे असेल, असं शेलार म्हणाले.

//<><><><><>//